सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## कृषि विभाग
## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
## ३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल: pmu@mahapocra.gov.in

जा. क्र. NDKSP- १४०२७(३६)/६/२०२६-१४ दि. / ०४ /२०२६

**प्रति,**

१. **विभागीय कृषी सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)**
२. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)**

**विषय : प्रकल्पांतर्गत फळबाग लागवड घटकाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्याबाबत.**
**संदर्भ** :- फळबाग लागवड मार्गदर्शक सूचना, NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT, दिनांक. २८/१०/२०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या फळबाग लागवड घटकासाठी संदर्भ क्रमांक १ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांतील मुद्दा क्रमांक ५.४.४ नुसार सहाय्यक कृषि अधिकारी स्तरावर सर्व फळपिकांसाठी डेस्क-२ वर माती परीक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तथापि, माती परीक्षण अहवाल प्रयोगशाळेकडून प्राप्त होण्यास विलंब होत असल्याने सहाय्यक कृषि अधिकारी स्तरावर मोठ्या प्रमाणात अर्ज प्रलंबित राहत असून, सदर बाबत क्षेत्रीय स्तरावरून सुधारणा करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने, कळविण्यात येते की सहाय्यक कृषि अधिकारी यांनी **लिंबुवर्गीय फळपिकांव्यतिरिक्त** इतर फळपिकांसाठी माती परीक्षण नमुना प्रयोगशाळेत सादर केल्याची पावती डेस्क-२ वर अपलोड करावी व डेस्क-४ वर मोका तपासणी अहवालासोबत संबंधित क्षेत्राचा माती परीक्षण अहवाल अपलोड करावा. मात्र, **लिंबुवर्गीय फळपिकांच्या बाबतीत** जमिनीतील सामू (Ph) व चुनखडीच्या प्रमाणाचा अन्नद्रव्यांच्या उपलब्धतेवर परिणाम होत असल्याने माती परीक्षण अहवाल डेस्क-२ वर सादर करणे पूर्वीप्रमाणेच बंधनकारक राहील.

तसेच, मार्गदर्शक सूचनांतील मुद्दा क्रमांक ४.१० नुसार फळबाग लागवडीसाठी कलमे/रोपे यांची खरेदी शासकीय रोपवाटिका/ कृषी विद्यापिठांच्या रोपवाटिका/ राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ (NHB) मानांकित खाजगी (नोंदणीकृत) रोपवाटीकांतून करण्यात यावी, असे नमूद करण्यात आले आहे. तथापि, यापैकी NHB मानांकित खाजगी (नोंदणीकृत) रोपवाटीकेतून रोपांची/कलमांची खरेदी झाल्यास संबंधित रोपवाटिका **NHB मानांकित असल्याबाबतचे वैध प्रमाणपत्र** मोका तपासणी अधिकारी यांनी डेस्क-४ वर अपलोड करणे आवश्यक राहील.

तसेच, ज्या रोपवाटिकांचे NHB मानांकन प्रमाणपत्र कालबाह्य झाले असून मानांकन नूतनीकरणाचा प्रस्ताव प्रलंबित आहे, अशा रोपवाटिकांना कलमे/रोपे विक्रीस सशर्त परवानगी देय राहील. अशा रोपवाटिकांच्या बाबतीत पूर्वीचे वैध NHB मानांकन प्रमाणपत्र व नूतनीकरणासाठी सादर केलेल्या अर्जाची प्रत डेस्क-४ वर अपलोड करणे आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे नमूद सूचनांचे पालन करून प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार फळबाग लागवड घटकाची कार्यक्षेत्रात प्रभावी अंमलबजावणी करावी.

Digitally signed by
Minal Karanwal
Date: 06-05-2026
15:12:10

(मीनल करनवाल)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प